महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२६/प्र.क्र.०३/प्रप्र/UG/सूचना क्र.०४/१७७७/२०२६/ दिनांक: २४ जुलै, २०२६

## जाहीर सूचना क्रमांक ०४

**राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अर्ज नोंदणीस मुदतवाढीबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता जाहीर सूचना क्रमांक ०१ नुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षांतर्गत कृषी शिक्षण विभागांमार्फत कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी (Online Application Form) व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणेसाठी दिनांक १०/०७/२०२६ पासून प्रारंभ झाला असून दिनांक २५/०७/२०२६ हा अंतिम दिनांक आहे.

तथापि काही विद्यार्थ्यांना अर्ज नोंदणी करताना अतिवृष्टीमुळे इंटरनेट सेवा खंडित, विद्युत पुरवठा खंडीत पडल्यामुळे अडचणी उद्भवत आहेत. तसेच काही महाविद्यालयांनी देखील मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. त्याअनुषंगाने कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्ज नोंदणी प्रक्रियेच्या कालावधीस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम | अर्ज नोंदणी सुरु झाल्याचा दिनांक | अर्ज नोंदणीचा पुर्वीचा अंतिम दिनांक | अर्ज नोंदणी मुदतवाढीचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम | १०/०७/२०२६ | २५/०७/२०२६ | ३१/०७/२०२६ |

सदरील अर्ज नोंदणी प्रक्रियेच्या मुदतवाढीचे सुधारीत वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या https://cetcell.mahacet.org संकेतस्थळावर लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात येईल. ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक ३१ जुलै, २०२६ असा आहे.

**सही/-**
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, मुंबई**